:: प्रसिध्दी पत्रक ::                                                    दिनांक 25/06/2025

आरोपी– 1) श्री मुकुंद चंद्रसेन आंधळे, वय 33 वर्ष, व्यवसाय–नौकरी उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बीड (वर्ग–1) अतिरीक्त पदभार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड. रा. प्लॉट नंबर 07 सारडा नगरी, बीड

2) किरणकुमार महादेवराव हिवाळे वय 45 वर्ष व्यवसाय– नौकरी, वरिष्ठ सहायक, उप विभाग माजलगाव प्रतिनियुक्ती ग्रामीण पाणी पुरवठा विभाग बीड. (वर्ग–3) रा. कॅनॉल रोड, जाधव यांचा वाडा, शाहु बॅकेच्या समोर, शिंदे नगर बीड. यांना 80000/रु (ऐंशी हजार रुपये) लाच मागणी करून स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांच्याकडुन कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | शिवाजीनगर, जिल्हा बीड. |
| आरोपीचे नांव व कार्यालय पत्ता | 1) श्री मुकुंद चंद्रसेन आंधळे, वय 33 वर्ष, व्यवसाय–नौकरी उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बीड (वर्ग–1) अतिरीक्त पदभार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड. रा. प्लॉट नंबर 07 सारडा नगरी, बीड<br>2)किरणकुमार महादेवराव हिवाळे वय 45 वर्ष व्यवसाय– नौकरी, वरिष्ठ सहायक, उप विभाग माजलगाव प्रतिनियुक्ती ग्रामीण पाणी पुरवठा विभाग बीड. (वर्ग–3) रा. कॅनॉल रोड, जाधव यांचा वाडा, शाहु बॅकेच्या समोर, शिंदे नगर बीड. |
| लाच मागणी व स्विकारलेली रक्कम | 80,000 रूपये लाच मागणी करून 80,000/रु लाच रक्कम स्विकारली. |
| सापळा अधिकारी | श्री.समाधान कवडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रारदार यांनी दिनांक 25/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे लेखी तक्रार दिली की, त्यांचे पिंपळवंडी ता. पाटोदा येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजने अंतर्गत भुमीगत नालीचे काम पुर्ण झाल्याचे अंतीम बिलाचे नोट शीटवर सही करुन वरिष्ठांकडे अंतीम बील मंजुरीसाठी पाठविण्याकरीता मुकुंद आंधळे, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बीड व किरणकुमार हिवाळे, वरिष्ठ सहायक ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड यांनी 35000 रुपये व जुने कामाचे 50000 रुपये असे एकुण 85000 रुपये लाचेची मागणी करीत आहेत वगैरे मजकुराची तक्रार दिली |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दिनांक 25/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे लिखित तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने दि.25/06/2025 रोजी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना कार्यकारी अभियंता ,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, बीड जिल्हा परिषद येथे पाठवून लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे क्रमांक 1 ने तक्रारदार यांच्याकडे पिंपळवंडी ता. पाटोदा येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजने अंतर्गत भुमीगत नालीचे काम पुर्ण झाल्याचे अंतीम बिलाचे नोट शीटवर सही करुन वरिष्ठांकडे अंतीम बील मंजुरीसाठी पाठविण्याकरीता 30000 रुपये व जुने कामाचे 50000 रुपये असे एकुण 80000 रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती कागदावर 80000 रुपये असे लिहुन लाच मागणी करुन स्वतः लाचेची रक्कम किरण हिवाळे वरिष्ठ सहाय्यक ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड. (वर्ग–3) यांचे मार्फत लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच किरण हिवाळे यांनी स्वतःसाठी व श्री. आंधळे यांचेसाठी 80000 रुपये ची लाच मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले.<br>आज दि. 25/06/2025 रोजी सापळा कारवाईचे आयोजन आलोसे यांचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जिल्हा परिषद बीड चे परिसरामध्ये केले असता आलोसे क्र. 2 किरण हिवाळे यांनी तक्रारदाराकडून पिंपळवंडी ता. पाटोदा येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजने अंतर्गत भुमीगत नालीचे काम पुर्ण झाल्याचे अंतीम बिलाचे नोट शीटवर सही करुन वरिष्ठांकडे अंतीम बील मंजुरीसाठी पाठविण्याकरीता 80000 रुपये लाच रक्कम स्वीकारताना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जिल्हा परिषद बीड चे परिसरामध्ये पंच साक्षीदार समक्ष रंगेहात पकडले. त्यांचे विरुध्द आज दिनांक 25.06.2025 रोजी पोलीस ठाणे शिवाजीनगर जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.श्री.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, श्री.मुकुंद अघाव, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, पोलीस निरीक्षक समाधान कवडे, पोलीस निरीक्षक राहुलकुमार भोळ, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, पांडुरंग काचगुंडे, अनिल शेळके, अविनाश गवळी, अमोल खरसाडे, संतोष राठोड, प्रदिप सुरवसे, अंबादास पुरी.सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड. |
| संकेतस्थळ | :– **acbwebmail@mahapolice.gov.in** |
| ई–मेल | :– **1 dyspacbbeed@mahapolice.gov.in** |
| | :- **2 dyspacbbeed@gmail.com** |
| ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन | :- **acbmaharashtra.net** |
| टोल फि कमांक | :– 1064 |
| दुरध्वनी कमांक | :– 02442–222649 |
| व्हॉटस अप क. | :– 9930997700 |
| पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर | :– 9923023361 |
| अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर | :– 9881460103 |
| पोलीस उप अधीक्षक,लप्रवि,बीड | :– 9518973185,7507654182 |

(सोपान चिटटमपल्ले)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

Office Of The D.Y.S.P Anti Corruption Bureau Beed